# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२८/०८/२०२२

## जाहीर आवाहन

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ रोजीपासून सुरु होत असलेल्या गणेशोत्सवाकरिता राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्याचे व त्यासाठी निवड करण्याची कार्यपद्धत शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.पूलदे-२०२२/प्र.क्र.१३३/सां.का.२, दि.२६ ऑगस्ट,२०२२ अन्वये निश्चित केली आहे.

एकूण ३६ जिल्ह्यांतील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांमधून ३ विजेते राज्य स्तरीय समितीकडून घोषित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास रुपये ५ लक्ष, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास रुपये २.५० लक्ष व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास १ लक्ष इतक्या रकमेचे पारितोषिक व प्रमाणपत्र तसेच उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळास रुपये २५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन शासनाकडून गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याचा **शेवटचा दिनांक ३० ऑगस्ट, २०२२** हा आहे.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल.

सदर अर्जाचा नमुना राज्य शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे www.pldeshandekalaacademy.org व दर्शनिका विभागाचे https://mahagazetteers.com संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर अर्ज व सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. सहभागी गणेशोत्सव मंडळाने **सदर अर्ज भरून** mahotsav.plda@gmail.com या ईमेलवर दि.३०.०८.२०२२ पूर्वी ऑनलाईन पाठवावेत.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व गणेशोत्सव मंडळांना आवाहन करण्यात येते कि, जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळानी सदर स्पर्धेत सहभाग घ्यावा.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**